# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गडचिरोली यांचे कार्यालय

## निवीदा सुचना

**क्रमांक बी-४(२६०)/प्रशासन/ ९३५ /२०२४, दिनांक ०८ /११/२०२४**

सर्व शासन मान्यता प्राप्त तसेच नोंदणीकृत कंत्राटदारांना सुचित करण्यात येते की, ग्राम न्यायालय, मुलचेरा व ग्राम न्यायालय,कोरची, जिल्हा-गडचिरोली येथील दोन शासकीय वाहन चालविण्याचे कामे करण्याकरीता दोन वाहन चालक बाह्ययंत्रणेद्वारे पुरविण्याकरीता मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून सिलबंद स्पर्धात्मक निवीदा आमंत्रीत करण्यात येत आहे. सदर निवीदा सादर करण्याची मुदत दिनांक ०७/१२/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंतच आहे. सिलबंद निवीदा प्रबंधक, जिल्हा न्यायालय, गडचिरोली या नावाने सादर करणे आवश्यक राहील. टपालाद्वारे कोणत्याही निवीदा स्विकारल्या जाणार नाहीत. निवीदा स्विकारण्याचा व नाकारण्याचा पुर्ण अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गडचिरोली यांना राहिल. निवीदा नमुना जिल्हा न्यायालयात उपलब्ध आहे. सदरहू विहीत नमुन्यात निवीदा सादर करावी लागेल. निवीदा अर्जाची किंमत रु. ५००/- राहील. तसेच निवीदेसोबत रु. ५,०००/- अनामत रक्कम धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे जमा करावे लागेल. धनादेश किंवा धनाकर्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गडचिरोली यांचे नावे असावा. याशिवाय अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | शासन, उच्च न्यायालय अथवा जिल्हा न्यायालय त्यांना आदेशीत करेल त्यानुसार ग्राम न्यायालय, कोरची व ग्राम न्यायालय, मुलचेरा येथील कामकाजाचे दिवशी तेथील वाहन चालविण्याकरीता तसेच आदेशान्वये महिन्यातील उर्वरीत दिवसांकरीता जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथील ०२ शासकीय वाहन चालविण्याकरीता ०२ अनुभवी वाहन चालक कंत्राटी तत्वावर पुरविणे. |

<u>अटी व शर्ती</u> :-

१. ग्राम न्यायालय, कोरची व ग्राम न्यायालय, मुलचेरा या आस्थापनेवरील वाहन तसेच जिल्हा न्यायालय, गडचिरोली येथील आस्थापनेवरील जिल्हा न्यायाधीश-१ यांचेकरीता असलेले अभिहस्तांकीत वाहन चालविण्याकरीता तसेच पुल वाहन चालविण्याकरीता ०२ अनुभवी बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी वाहन चालक पुरविण्याकरीता बाह्य यंत्रणेद्वारे निवीदा सादर करणे.

२. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी वाहन चालकांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन अदा करता येणार नाही. (वेतन १५,७८०/- व राहणीमान २,३१०/- एकुण १८,०९०/- या किमान वेतनाच्या दरापेक्षा कमी नसावा) तसे झाल्यास संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व सदर कंत्राटदाराचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्यांचे नाव काळ्या यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

३. कंत्राटदाराने कंत्राटी वाहन चालकांना कामाचे वेतन व त्याअनुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता, संबंधीत कंत्राटी वाहनचालकाच्या नावाने Account payee Cross Cheque द्वारेच (रेखांकित धनादेशाव्दारेच) अदा करावे किंवा ई.सी.एस.व्दारे/एन.ई.एफ.टी.व्दारे त्यांच्या बँक खात्यात जमा करणे आवश्यक राहील.

४. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या वेतनाच्या/इतर भत्त्यांच्या धनादेशाची (चेकची) छायांकीत प्रत किंवा ई.सी.एस.व्दारे/एन.ई.एफ.टी.व्दारे वेतनाची रक्कम/इतर भत्त्याची रक्कम कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा केल्याचे दर्शविणारे बँक अधिकाऱ्यांच्या सहीचे विवरणपत्र (Statement) आणि कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर संबंधीत कंत्राटी कामगाराचा धनादेश क्रमांक/ई.सी.एस.व्दारे/एन.ई.एफ.टी. क्रमांक लिहीलेला असेल) कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. जोपर्यंत कंत्राटदार उक्त कागदपत्रे कार्यालयात सादर करणार नाही. तोपर्यंत त्या महिण्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

५. कंत्राटी सेवाच्या कंत्राटाचा कालावधी <u>दोन वर्षांचा</u> राहील. त्याशिवाय जास्त कालावधीचा राहणार नाही.

६. किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार, कंत्राटदाराने कंत्राटी कामगारास भरपगारी साप्ताहीक सुट्टी देणे बंधनकारक असेल. त्यामुळे कंत्राटदाराने साप्ताहीक सुटीच्या दिवशी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्या कंत्राटी कर्मचाऱ्यास बदली रजा अथवा किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यानुसार देय असलेले त्या दिवसाचे वेतन यापैकी कोणताही एक पर्याय निवडता येईल. कंत्राटी कामगाराने बदली रजेचा पर्याय निवडल्यास कार्यालयीन कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून बदली रजेच्या दिवशी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कामगारासाठी कंत्राटदारास किमान वेतन कायदा व कामगार कायद्यातील तरतूदीनुसार योग्य ते वेतन संबंधीत कार्यालयाकडून अदा करण्यात येईल.

७. शासकीय वेळेनंतर कंत्राटी वाहन चालकाना जास्तीचे काम करावे लागल्यास त्यांना किमान वेतन अधिनियम व कामगार कायद्यातील तरतूदीनुसार योग्य तो अतिकालीक भत्ता (Overtime) भत्ता कार्यालयाकडून कंत्राटदारास अदा करण्यात येईल. सदर भत्याचे स्वतंत्र देयक कंत्राटदाराने प्रत्येक महिण्याच्या ०५ तारखेपूर्वी कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

८. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कार्यालयात हजर होताना व कार्यालय सोडताना, जिल्हा न्यायालय, गडचिरोली, प्रसंगी ग्राम न्यायालय, मुलचेरा, स्थित-चामोर्शी व ग्राम न्यायालय, कोरची, स्थित-कुरखेडा या कार्यालयात बायोमेट्रीक प्रणाली उपलब्ध असल्यास तेथे बायोमेट्रीक प्रणालीवर त्यांची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक राहील. सदरहू नोंदणीसाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे. अगर उक्त कार्यालयात बायोमेट्रीक प्रणाली उपलब्ध नसल्यास तेथे स्वतंत्र हजेरी पटावर कार्यालयात कंत्राटी कामगाराची उपस्थिती व कार्यालय सोडल्याबाबतच्या नोंदी राहील.

९. वयाच्या १८ वर्षाचे आतील वाहन चालक कामावर ठेवता येणार नाही.

१०. कंत्राटदाराने शासकीय वाहन चालविण्यासाठी पुरविण्यात आलेला वाहन चालकाला न्यायालयीन कामगार किंवा कर्मचारी म्हणून संबोधला जाणार नाही किंवा त्यांची न्यायालयीन कामगार किंवा कर्मचारी म्हणून गणना केली जाणार नाही.

११. कंत्राटदारामार्फतीने पुरविलेल्या वाहन चालकाचा विमा उतरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. न्यायालय यासाठी जबाबदार राहणार नाही.

१२. कंत्राटदाराने पुरविलेल्या कंत्राटी वाहन चालकाकडून कार्यालयातील कोणत्याही प्रकारचा दस्ताऐवज व अभिलेखास तसेच चालवित असलेल्या शासकीय वाहनास किंवा ईतर मालमत्तेस नुकसान केल्यास किंवा त्यांचेकडून झाल्यास संबंधीत वाहन चालकावर त्याचप्रमाणे कंत्राटदारावर फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

१३. कंत्राटदारास कंत्राटाच्या माध्यमातून प्राप्त उत्पन्नावर कर भरण्याची जबाबदारी पूर्णत: कंत्राटदाराची राहील. तसेच वस्तु व सेवा कर (राज्य वस्तु सेवा कर आणि केंद्र वस्तु व सेवा कर) कार्यालयाकडून कपात करण्यात येईल.

१४. कंत्राटदाराने नेमलेल्या वाहन चालकाची शैक्षणिक अर्हता किमान १२ वी उत्तीर्ण आवश्यक असून जड किंवा हलके वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक आहे. वाहन चालकाला जड किंवा हलके वाहन चालविण्याचा किमान ०३ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त अनुभव असणे आवश्यक आहे.

१५. कंत्राटदाराने नेमलेल्या वाहन चालकास कंत्राटदाराकडून पांढरे गणवेश पुरवावे लागतील. याकरीता न्यायालयाकडून कंत्राटाव्यतीरिक्त धुलाई भत्ता मिळणार नाही.

१६. ज्यावेळेस वाहन चालविण्याचे काम नसेल त्यावेळीस कार्यालयाच्या निर्देशानुसार ईतर कार्यालयीन कामे करावे लागतील.

१७. कंत्राटदाराने निवीदा प्रक्रियेसाठी निवीदा अर्ज सादर करताना त्यांच्या कंपनी/संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र/सेवा कराचे प्रमाणपत्र/मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र/पॅनकार्ड/ई.एस. आय.सी.प्रमाणपत्र/पी.एफ.प्रमाणपत्र/प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र या सर्व प्रमाणपत्राची छायांकीत व स्वसाक्षांकीत प्रत निवीदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर छायांकीत प्रमाणपत्रावर संबंधीत कार्यालय प्रमुखानी मुळ कागदपत्रे तपासून ती योग्य असल्याचे स्वाक्षरीत व प्रमाणित/साक्षांकीत करणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने निवीदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निवीदा अर्ज निवीदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

१८. ज्या निवीदेमध्ये कंत्राटदाराने त्यांच्या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम, ही किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगाराला देय करण्यात आलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेत जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम व कामगार कायद्यातील इतर तरतूदीनुसार देय रकमा यापेक्षा कमी नमूद केली असल्यास, अशा कंत्राटदाराची निवीदा रद्द करण्यात येईल.

१९. निवीदा सादर करावयाचा नमूना जिल्हा न्यायालयाकडून उपलब्ध करुन देण्यात येईल. निवीदा अर्जाची किंमत रु. ५००/- राहील. तसेच निवीदेसोबत रु. ५,०००/- अनामत रक्कम धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे जमा करावे लागेल. धनादेश किंवा धनाकर्ष प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, गडचिरोली यांचे नावे असावा.

मुळ प्रत माननिय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली यांच्याव्दारे अनुमोदीत.

प्र.प्रबंधक,
जिल्हा न्यायालय,गडचिरोली